**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

**दिनांक – १४/१२/२०१८** **वेळ – सकाळी ११.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षीक सभा **शुक्रवार** दिनांक **१४/१२/२०१८** रोजी **सकाळी ११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.अपर्णा निलेश डोके
५. मा.अश्विनी विक्रम वाघमारे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) महापौर चषक राज्यस्तर खो खो स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.४) महापौर चषक ५०वी राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा २०१८-१९(महिला व पुरुष) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.५) मनपा परिसरातील मतिमंद व दिव्यांग विद्यार्थ्याच्या विविध क्रीडा स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.६) मराठी भाषा संवर्धन समिती गठीत करणेबाबत - मा.अंबरनाथ कांबळे , मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड संगीत अकादमीमध्ये क्लासिकल डान्स अंतर्गत भरतनाटयम कथ्थक डान्स प्रशिक्षण वर्ग सुरु करणेबाबत. – मा.सुजाता पालांडे , मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) ARN यांच्या ३७ व्या रोईंग स्पर्धेला मदत करणेबाबत. – मा.सुजाता पालांडे , मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव

विषय क्र.९) मनपाचे उद्यानात व मैदानात ओपन जीमचे साहित्य खरेदी करणेबाबत.

----------

दिनांक १२/११/२०१८ व २६/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ५८ | विषय क्रमांक – ०१

दिनांक – १४/१२/२०१८ | विभाग – क्रीडा

सुचक – मा.सुजाता पालांडे | अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/३१९/२०१८, दि.२६/११/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

कार्याध्यक्ष, पुना डीस्ट्रीक्ट इंटरऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन पुणे ४११ ००२ यांनी १) कबड्डी, २) फुटबॉल, ३) लॉन टेनिस, ४) बास्केटबॉल, ५) कुस्ती या ५ क्रीडा स्पर्धा आर्थिक पुरस्कारासाठी म.न.पा.स दिलेल्या आहेत. या स्पर्धांना अनुक्रमे १) र.रु.१८,७००/-, २) र.रु.२०,०००/-, ३) र.रु.३०,०००/-, ४) र.रु.२०,०००/-, ५) र.रू.१५,६००/-, एकूण र.रु.१,०४,३००/- इतका खर्च असून यामध्ये मैदान/कोर्ट, पंचाचे मानधन, शटल्स् किंवा चेंडूचा खर्च, विजयी उपविजयी संघांना वैयक्तिक बक्षिसे व चषक फोटोग्राफर ई.चा समावेश आहे. त्यानुसार पुना डीस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन यांच्या विविध क्रीडा स्पर्धांना सन २०१८-१९ करिता म.न.पा.च्या वतीने आर्थिक पुरस्कार देणेकामी आर्थिक सहाय्य एकूण र.रु.१,०४,३००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५९ | विषय क्रमांक – ०२

दिनांक – १४/१२/२०१८ | विभाग – क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/५८४/२०१८, दि.२९/१०/२०१८

विषय - श्री.नंदकुमार कचेश्वर रोकडे,लॉनटेनिस प्रशिक्षक यांना सेक्टर क्र.२५ निगडी प्राधिकरण येथील लॉनटेनिस ११ महिने भाडे कराराने चालविण्यास देणेबाबत मान्यता घेणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६० | विषय क्रमांक – ०३

दिनांक – १४/१२/२०१८ | विभाग – क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे | अनुमोदक – मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/४५४/२०१८, दि.१३/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने,महाराष्ट्र राज्य खो खो असोसिएशन व पुणे जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या मान्यतेने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात प्रभाग क्र.१८ शिवाजी उदय मंडळ, तानाजीनगर, चिंचवडगांव येथे महापौर चषक राज्यस्तर खो खो स्पर्धा २०१८ आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमूदप्रमाणे येणा-या र.रु.१९,९४,२००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच मैदान तयार करणे व स्टेज,टेबल खुर्च्या , गॅलरी व्यवस्था खर्च, पंच व खेळाडू निवास व्यवस्था ठिकाणी गाद्या,उशा,बादली,मग,चादरी,बेडशिट इ.पुरविणे खर्च हा स्थापत्य विभाग,संबंधित क्षेत्रीय कार्यालय व स्पर्धा ठिकाणी विद्युत स्पिकर,माईक व जनरेटर व्यवस्था तसेच महिला व पुरुष खेळाडू निवास व्यवस्था ठिकाणी लाईट व्यवस्था व स्टँड फॅन इ. व्यवस्था खर्च हा विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.१९,९४,२००/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा लेखाशिर्षातून खर्ची करणेस व होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६१ — विषय क्रमांक – ०४

दिनांक – १४/१२/२०१८ — विभाग – क्रीडा

सुचक – मा.सुजाता पालांडे — अनुमोदक – मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/४४९/२०१८, दि.१३/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य हॉलिबॉल असोसिएशन यांचे मान्यतेने महापौर चषक ५० वी राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा २०१८-१९(महिला व पुरुष) ही स्पर्धा प्रभाग क्र.२ चिखली येथे आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमूदप्रमाणे येणा-या र.रु.४२,३५,१००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सदर स्पर्धा अनुषंगाने ट्रॉफिज,पंचांना व खेळाडूंना द्यावयाची स्मृतीचिन्हे,मेडल्स खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर छपाई, क्रीडा साहित्य खरेदी, प्रमाणपत्र, निमंत्रण पत्रिका छपाई इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस, तसेच मैदान तयार करणे व स्टेज,टेबल,खुर्च्या,गॅलरी व्यवस्था खर्च, पंच व खेळाडू निवास व्यवस्था ठिकाणी गाद्या, उशा, चादरी, बेडशिट, बादली, मग इ. पुरविणे बाबतचा खर्च र.रु.७,५०,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय व स्पर्धा ठिकाणी विद्युत स्पिकर, माईक व जनरेटर व्यवस्था, तसेच महिला व पुरुष खेळाडू निवास व्यवस्था ठिकाणी लाईट व्यवस्था व स्टँड फॅन इ.व्यवस्था खर्च र.रु.१,००,०००/- हा विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.३३,८५,१००/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची करणेस व होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६२ विषय क्रमांक – ०५
दिनांक – १४/१२/२०१८ विभाग – क्रीडा
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अश्विनी वाघमारे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/३४६/२०१८, दि.१३/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व साई संस्कार संस्था, चिंचवड, पुणे १९ यांच्या सहकार्याने सन २०१८-१९ मध्ये श्री.स्वामी विवेकानंद क्रीडांगण, महात्मा फुलेनगर, चिंचवड येथे मतिमंद व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमूदप्रमाणे येणा-या र.रु.८,८१,३७०/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व सहभागी शाळांना भेट वस्तू, मेडल्स खरेदी, पी व्ही सी फ्लेक्सबॅनर्स इ.खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व सदर खर्चातील विद्युत स्पिकर, माईक जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.५५,०००/- हा विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय व स्टेज मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च र.रु.१,१०,०००/- हा स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित खर्च र.रु.७,१६,३७०/- हा खर्च क्रीडा विभागाचे क्रीडा निधी मनपा तर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा,खेळाडू विद्यार्थ्यांना सकर आहार या लेखाशिर्षातून खर्ची करणेस व होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६३ विषय क्रमांक – ०६
दिनांक – १४/१२/२०१८
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे
संदर्भ – मा.अंबरनाथ कांबळे , मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१७१६४ दिनांक ०६/०९/२०१६ अन्वये मराठी भाषा संवर्धन समिती गठीत करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

१. मा.संजय नेवाळे,
**सभापती क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समिती** – सदस्य
२. प्रशासन अधिकारी, (प्राथमिक शिक्षण विभाग)
पिंपरी चिंचवड मनपा - पदसिध्द सदस्य व सदस्य सचिव
३. सहाय्यक प्रशासन अधिकारी,
(प्राथमिक शिक्षण विभाग) - पदसिध्द सदस्य व सह सदस्य सचिव
४. मा.श्री.राजन लाखे - सदस्य
५. मा.डॉ.शहाबुद्दीन नुरमहंमद पठाण - सदस्य
६. मा.श्री.धनंजय ऊर्फ धनाजी भिसे - सदस्य
७. डॉ.राजाभाऊ भैलुमे - सदस्य
८. प्रा.संजय पवार - सदस्य

९. प्रा.गुलाबराव देशमुख - सदस्य
१०. श्रीम.अपर्णा मोहिले - सदस्य
११. मा.डॉ.राजेंद्र कांकरिया - सदस्य
१२. मा.डॉ.राजश्री मराठे - सदस्य
१३. श्रीम.विनीता ऐनापुरे - सदस्य
१४. डॉ रजनी शेठ - सदस्य
१५. श्री.राज अहिरराव - सदस्य
१६. मा.संभाजी बारणे - सदस्य
१७. डॉ.स्नेहल अग्निहोत्री - सदस्य
१८. मा.प्रा.तुकाराम पाटील - सदस्य
१९. मा.झुंजार सावंत - सदस्य
२०. श्रीम.सुरेखा कुलकर्णी, क.अभियंता पर्यावरण - सदस्य
२१. श्री.अविनाश हरिचंद्र वाळूंज,दिघी मनपा शाळा - सदस्य
२२. श्री.संतोष सोपान उपाध्ये,विद्यानिकेतन शाळा - सदस्य
२३. मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे - सदस्य
२४. मा.सौ.सुजाता सुनील पालांडे - सदस्य
२५. मा.सौ.अपर्णा निलेश डोके - सदस्य

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६४ विषय क्रमांक – ०७
दिनांक – १४/१२/२०१८
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अपर्णा डोके
संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव –

मनपाच्या वतीने निगडी येथे पिंपरी चिंचवड संगीत अकादमी चालविली जाते सदर संगीत अकादमीमध्ये गायन, हर्मोनियम, तबला, सुगमसंगीत, यांचे प्रशिक्षण दिले जाते. या संगीत प्रशिक्षणा बरोबरच क्लासिकल डान्स अंतर्गत भरतनाटयम, कथ्थक डान्स, प्रशिक्षण वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६५ विषय क्रमांक – ०८
दिनांक – १४/१२/२०१८
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव –

आर्मी रोईंग लोड कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरींग, सी.एम.ई., पुणे यांच्या पत्रानुसार ३७ व्या राष्ट्रीय रोईंग स्पर्धा ही दि.१७ ते २२/१२/२०१८ या कालावधीत होत आहे. मा.आयुक्तसो यांचे समवेत चर्चा झालेनुसार या स्पर्धासाठी होणा-या अंदाजे र.रु.२,००,०००/-(अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६६ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १४/१२/२०१८ विभाग – क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/९/कावि/५२०/२०१८, दि.१४/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन्मानीय नगरसदस्य,नगरसदस्या यांनी एकूण ४५ मागणी पत्राद्वारे ७६ ठिकाणी ओपन जीमचे साहित्य खरेदी करुन विविध ठिकाणी बसवीणेस सांगितले असून सदर ओपन जीमचे साहित्य मध्यवर्ती भांडार विभागाकडून ई निविदा प्रसिध्द करुन खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७६५/२०१८
दिनांक : १४/१२/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.